महाराष्ट्र शासन

क्र. अधापु २०१७/ प्र.क्र. ७०/ना.पु.२२
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १८ मार्च, २०१७.

प्रति,

१) जिल्हाधिकारी, औरंगाबाद, जालना, नांदेड, बीड, परभणी, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली, अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा

२) जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद, जालना, नांदेड, बीड, परभणी, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली, अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा.

**विषय :-** राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत समाविष्ट न झालेल्या राज्यातील १४ जिल्ह्यांतील एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेप्रमाणे अन्नधान्याचा लाभ देण्यासाठी माहे **एप्रिल, २०१७** करिता मासिक नियतन.

**संदर्भ :-** १) शासन निर्णय क्रमांक अधापु-२०१५/प्र.क्र.१००/नापु-२२, दिनांक २४/०७/२०१५.
२) शासन परिपत्रक क्रमांक अधापु-२०१५/प्र.क्र.१००/नापु-२२, दिनांक ५/०८/२०१५.
३) शासन निर्णय क्रमांक असुका-२०१६/प्र.क्र.१२५/नापु-२२, दिनांक १३/१०/२०१६.
४) केंद्र शासनाचे क्र. २/महाराष्ट्र/२०१५- बीपी-III, दि.२१/२/२०१७ चे पत्र.

औरंगाबाद विभागातील औरंगाबाद, जालना, नांदेड, बीड, परभणी, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली, अमरावती विभागातील अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व नागपूर विभागातील वर्धा या १४ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या धर्तीवर सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ देण्याकरिता माहे फेब्रुवारी, २०१७ ते जुलै, २०१७ करिता केंद्र शासनाच्या संदर्भाधीन दिनांक २१.२.२०१७ च्या पत्रान्वये अन्नधान्याचे नियतन प्राप्त झाले आहे.

२. दिनांक २४/७/२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेत समाविष्ट नसलेल्या एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना अन्नधान्य देण्यासाठी याद्वारे माहे **एप्रिल, २०१७** करिता अन्नधान्याचे मासिक नियतन मंजूर करण्यात येत आहे. माहे **एप्रिल, २०१७** करिता जिल्हानिहाय अन्नधान्याच्या मासिक नियतनाचा तपशिल सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविण्यात आला आहे.

शासन निर्णय दिनांक २४/७/२०१५ नुसार विहित केलेल्या परिमाणाच्या मर्यादेत गहू व तांदळाचे वाटप करावे.

संदर्भाधीन दि. १३.१०.२०१६ च्या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत देण्यात आलेल्या इष्टांकानुसार जर शेतकरी लाभार्थ्यांचा काही प्रमाणात समावेश करण्यात आला असल्यास अथवा अन्य कोणत्याही कारणाने शेतकरी लाभार्थ्यांच्या संख्येत बदल करण्यात आला असल्यास ती आकडेवारी विचारात घेऊन अन्नधान्याचे वाटप करण्यात यावे.

३. राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये समाविष्ट न झालेल्या एपीएल (केशरी) मधील लाभार्थ्यांपैकी शेतकऱ्यांना प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांप्रमाणे प्रतिव्यक्ती ५ किलो अन्नधान्याचे वाटप करण्यात यावे. सदर योजनेच्या लाभाकरिता संदर्भाधीन दि.५.८.२०१५ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सूचनांचे पालन करावे.

४. **उपरोक्त लाभार्थ्यांना अन्नधान्य देण्याकरिता ते केंद्र शासनाकडून ECONOMIC COST दराने खरेदी करण्यात यावे. केंद्र शासन / भारतीय अन्न महामंडळाकडून ₹ २३४४.८०/- प्रति क्विंटल दराने गहू व**

